# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २९/११/२०२३ (बुधवार)

---

## ग्रामीण भागात बकरी चोरी करणारी अट्टल दोन टोळ्या जेरबंद
### तब्बल १५ गुन्हयाचा उलगडा
### एकुण ७,७२,५००/—रुपयाचा मुद्देमाल जप्त
**(स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई)**

नागपूर ग्रामीण घटकाअंतर्गत बकरी चोरी करणाऱ्या गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्याकरीता नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री हर्ष पोद्दार यांनी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात दोन विशेष पथके तयार केले. विशेष पथकाने जिल्हयातील विवीध पोलीस स्टेशनला नोंद गुन्हयांचा अभ्यास करुन प्रत्येक बकरी चोरीच्या घटनेमधील आरोपींच्या गुन्हे करण्याच्या कार्यपध्दतीवर केंद्र लक्षीत करुन समांतर तपास सुरु केला. तपासादरम्यान प्राप्त तांत्रीक पुराव्यांच्या आधारे व गोपनिय मुख्याबराने दिलेल्या माहितीवरुन दि. २८/११/२०२३ रोजी कन्हान येथील तारसा रोड जवळ बकरी चोरी करणाऱ्या दोन टोळया चारचाकी वाहनासह जेरबंद केल्या ज्यामध्ये पहीली टोळी सोहेल अली याची असून **१) सोहेल अली वल्द कादर अली वय २१ वर्ष, रा. कामगार नगर, भोलाराम किराणा स्टोअर्स जवळ, नारी रोड, नागपूर २) तस्लीम रजा उर्फ राजा वल्द शेख मक्सुद वय २२ वर्ष रा. तेजीया कॉलनी, टायर चौक, उपलवाडी, नागपूर** आणि **३) अरबाज वल्द हमीद खान वय २३ वर्ष रा. ब्लॉक नं. ५०, क्वॉर्टर नं. ७८२, म्हाडा कॉलनी, नारी रोड नागपूर** यांनी नागपूर ग्रामीण जिल्हयातील खालील पोलीस स्टेशन हद्दीत बकरी चोरी केल्याचे उघड झाल्याने त्यांचे कडून ०१ मोबाईल फोन, ०१ चारचाकी फोर्ड फियास्टा वाहन क्र. MH 06 AS 7792 आणि रोख १,१२,५००/— रुपये असा **एकुण ५,२२,५००/— रुपयांचा** मुद्देमाल हस्तगत केला आहे.

१) पो.स्टे. रामटेक गुन्हे रजी.नं. ७३८/२०२३ कलम ३७९ भादवि
२) पो.स्टे. रामटेक गुन्हे रजी.नं. ८२८/२०२३ कलम ३७९ भादवि
३) पो.स्टे. रामटेक गुन्हे रजी.नं. ८५३/२०२३ कलम ३७९ भादवि
४) पो.स्टे. कोंढाळी गुन्हे रजी.नं. ७३०/२०२३ कलम ३७९ भादवि
५) पो.स्टे. कोंढाळी गुन्हे रजी.नं. ७६४/२०२३ कलम ३७९ भादवि
६) पो.स्टे. कोंढाळी गुन्हे रजी.नं. ७८२/२०२३ कलम ३७९ भादवि
७) पो.स्टे. देवलापार गुन्हे रजी.नं. ४३१/२०२३ कलम ३७९ भादवि
८) पो.स्टे. परशिवनी गुन्हे रजी.नं. ३९४/२०२३ कलम ३७९ भादवि
९) पो.स्टे. MIDC बोरी गुन्हे रजी.नं. ३९७/२०२३ कलम ३७९ भादवि
१०) पो.स्टे. खापा गुन्हे रजी.नं. ४७१/२०२३ कलम ३७९ भादवि

दुसरी टोळी रुपेश पाली याची **१) रुपेश राजू पाली वय ३२ वर्ष रा. पवनी ले—आउट, डोरल्या काच कंपणी जवळ, पिवळी नदी, उपलवाडी, नागपूर** आणि त्याचा साथीदार **२) मुन्नी सरदार रा. यशोधरा नगर, नागपूर** यांनी नागपूर ग्रामीण जिल्हयातील खालील पोलीस स्टेशन हद्दीत बकरी चोरी केल्याचे उघड झाल्याने त्यांचे कडून ०१ मोबाईल फोन, ०१ वाहन शेवलेट कंपणी स्पार्क वाहन क्र. MH 43 AJ 2129 आणि रोख ५०,०००/— रुपये असा **एकुण २,५५,०००/— रुपयांचा** मुद्देमाल हस्तगत केला आहे.

१) पो.स्टे. रामटेक गुन्हे रजी.नं. ७५९/२०२३ कलम ३७९ भादवि
२) पो.स्टे. रामटेक गुन्हे रजी.नं. ७७४/२०२३ कलम ३७९ भादवि
३) पो.स्टे. रामटेक गुन्हे रजी.नं. ८४१/२०२३ कलम ३७९ भादवि
४) पो.स्टे. खापरखेडा गुन्हे रजी.नं. ६३७/२०२३ कलम ३७९ भादवि
५) पो.स्टे. खापरखेडा रजी.नं. ६६०/२०२३ कलम ३७९ भादवि

वरील दोन्ही टोळीतील सदस्यांकडून **एकुण ७,७७,५००/— रुपयांचा** मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला असून नागपूर ग्रामीण जिल्हयातील बकरी चोरीचे **एकुण १५ गुन्हे उघडकीस** आले आहे.

वरील दोन्ही टोळीतील आरोपी हे बकरी चोरी करण्यापुर्वी ग्रामीण भागात जावून टेहाळणी करायाचे व मध्यरात्रीच्या वेळी संधी मिळताच त्यांचे जवळील चारचाकी वाहनात बकऱ्या टाकुन चोरी करायचे या दोन्ही टोळींनी नागपूर ग्रामीण हद्दीत गोरगरीबांच्या बकऱ्या चोरी करुन त्यांचे आर्थीक नुकसान करण्याचा अक्षरश: धुमाकूळ घातला होता, अखेर स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकांनी रात्रंदिवस अथक परिश्रम करुन अतिशय कौशल्यपुर्ण समांतर तपास केला व आरोपींच्या मुसक्या आवळल्या.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री हर्ष पोद्दार व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सहा. पोलीस निरीक्षक, राजीव कर्मलवार, आशिषसिंह ठाकूर, पोलीस उपनिरीक्षक बटूलाल पांडे, सहा. फौजदार ज्ञानेश्वर राऊत, पोलीस हवालदार दिनेश आधापूरे, विनोद काळे, ईक्बाल शेख, रोशन काळे, प्रमोद भोयर, शंकर मडावी, उमेश फुलबेल, नितेश पिपरोदे, संजय भदोरिया, चालक पोलीस हवालदार अमोल कुथे, मुकेश शुक्ला तसेच सायबर सेलचे पोलीस नायक सतिष राठोड, स्नेहलता ढवळे, यांनी पार पाडली.

सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.



## प्राण्यांना निर्दयतेने कत्तलीसाठी नेणा—या आरोपींवर कारवाई
## २४ जनावरे व आयसर ट्रक सह एकुण २७,६०,१२०/—चा मुद्देमाल जप्त

दिनांक २८.११.२०२३ रोजी फिर्यादी व कन्हान चा स्टॉफ यांना गोपनीय सुत्रा कडून माहिती मिळाली की, जबलपूर कडून नागपूर मार्गे आयसर ट्रक क्रमांक एम एच ४० सी एम ८३५१ वाहनात अवैध्यरित्या गोवंश जातीचे जनावरे (म्हशी) हे क्लेशदायक व क्रुरपणे भरून कत्तली करीता घेवून जात आहे, अश्या मिळालेल्या माहिती वरून यातील पोलीस स्टॉफ यांनी जबलपूर ते नागपूर नॅशनल हायवे ४४ रोड वरील मौजा कांद्री रोड वरील टोल नाका या ठिकाणी सदर वाहन पकडले असता, **एक आयसर ट्रक क्रमांक एम एच ४० सी एम ८३५१ मध्ये एकुण २४ गोवंश जातीचे जनावरे मिळून आले सदर ट्रक चालक क्लीनर यांना ताब्यात घेवून २४ जनावरे व आयसर ट्रक तसेच इतर साहित्य यांची एकुण कि. २७,६०,१२०/— रू जप्त केले.**

नाव आरोपी :— १) चालक मो. शाकीर वल्द मो. हनिफ खान रा. वार्ड क्र ३ खांखरा पो ट सिल्ललीस थाना कुरई जिल्हा शिवनी बालाघाट मध्यप्रदेश
२) क्लीनर बिलाल जाकीर कुरेशी रा. मरकीन मस्जीद जवळ रा. वार्ड क्र ११ रहातगढ, भोपाल मध्यप्रदेश
३) फरार आरोपी इमरान यासीम खान रा. देवरी मध्यप्रदेश सिवनी

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सरतर्फे सहायक पोलीस निरीक्षक अमित तिर्थराज पांडे रा. विषेश पोलीस पथक ना.ग्रा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम 11(1)(aa),11(a1)(da),11(a1)(ae)11(1a)(fa),11(1)(i), 9, 109, 34 प्राणी संरक्षण कायदा अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास एएसआय गणेश पाल मो क्र 9552517268 हे करीत आहे

सदरची कारवाई नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधिक्षक श्री हर्ष पोद्दार सर (भा.पो.से.), तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री संदीप पखाले, यांचे आदेशाने सहायक पोलीस निरीक्षक अमित तिर्थराज पांडे, सोबत स्टाफ पोलीस हवालदार ललित उईके, शुभम मोरोकर, पोलीस नाईक प्रणय बनाफर, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, बालाजी बारगुले, व त्यांचे स्टॉफ ने पार पाडली.

## टाटा सुमो चोरी करणारा आरोपी अटकेत

दिनांक २८.११.२०२३ रोजी पोलीस स्टेशन मौदा अपराध क्र. ३२४/२३ कलम ३७९ भादवि चे गुन्हयातील आरोपी यांचा शोध घेतला असता मुखबीर द्वारे खबर मिळाली कि, सदर गुन्हा हा यादव नगर, नागपुर येथे राहणारा रामकृष्ण केने याने केला आहे. यावर सदर आरोपी यास यादव नगर, नागपूर येथुन ताब्यात घेवुन सदर गुन्हयात चोरी गेलेली टाटा सुमो बाबत विचारपुस केली असता सदर गुन्हयातील १ टाटा सुमो व अपराध क्र ९०४/२०२३ कलम ३७९ भादवि मधील एक टाटा सुमो अशा २ टाटा सुमो मौदा हद्दीतुन चोरी केल्याची कबुली दिल्याने सदर आरोपी यास पुढील तपासकामी पोलीस स्टेशन मौदा यांचे ताब्यात देण्यात आले.

**नाव आरोपी :— रामकृष्ण शेषराव केने वय ४६ वर्ष रा यादव नगर, नागपूर**

सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक श्री बट्टुलाल पांडे, एएआय नाना राउत, पोहवा विनोद काळे, ईकबाल शेख, पोना विरू नरड, संजय बरोदीया, चालक मोनु शुक्ला यांनी पार पाडली.

## फुस लावुन पळवुन नेणा—या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पोलीस स्टेशन कोंढाळी :—** अंतर्गत चिचोली पठार २० किमी. दक्षिण, दिनांक २६.११.२३ चे १५.०० वा दरम्यान, फिर्यादी हे साळेभाउ यांचे घरी कन्हान येथे गेले असता, रात्री २०.०० वा फिर्यादीचे मुलाने फोन करून सांगितले की, ताई दुपारी ०३.०० वा दरम्यान आरोपी नामे— आदित्य उर्फ ददु मारबते रा भंडागी ता कळमेश्वर याचेसोबत मोटर सायकलवर बसुन गेली आहे, जाण्याबददल काहीही सांगितले नाही व आतापर्यंत घरी परत आली नाही. तेव्हा फिर्यादीने दि २७.११.२३ रोजी आजु बाजुला तसेच नातेवाईकाकडे शोध घेतला मिळुन आली नाही. यातील आरोपीने फिर्यादीची नाबालीग मुलगी पिडीता वय १७ वर्षे हिला फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतुन घरून फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी नामे— आदित्य उर्फ ददु मारबते रा भंडागी ता कळमेश्वर जि नागपुर यांचेरूध्द कलम ३६३ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील सफौ सुभाष साळवे पो स्टे कोंढाळी हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

**पोलीस स्टेशन रामटेक_ :— अंतर्गत** मौजा नगरधन, येथील मृतक नामे— यश एकनाथ नागरीकर वय १९ वर्ष रा. नगरधन हा फिर्यादीचा भाउ असुन मृतक याला लहानपनापासुन छातीला छीद्र होते, त्याचा उपचार नागपुर येथे सुरू होते. दिनांक २८/११/२३ चे १७.०० वा सुमारास यातील मृतकच्या छातीत अचानक दुखत असल्याने त्याला उपचारा करीता फीर्यादीचे काका व काकु यांनी सरकारी दवाखाना रामटेक येथे नेले असता डॉक्टरानी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— योगेश एकनाथ नागरीकर वय २३ वर्ष रा. नगरधन यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ चा मर्ग दाखल करण्यात आला. सदर मर्ग चा पुढील तपास पोहवा रेहपाडे हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**